# भारत आणि पाकिस्तान मध्ये आण्विक केंद्र यादीचे आदानप्रदान

01 जानेवारी, 2025

भारत आणि पाकिस्तान मध्ये राजनैतिक माध्यमातून नवी दिल्ली आणि इस्लामाबाद येथे एकाचवेळी आण्विक केंद्रे आणि सुविधा यादीचे आदानप्रदान करण्यात आले. आण्विक केंद्रे आणि सुविधा हल्ला प्रतिबंध करारनुसार यादीचे आदानप्रदान केले जाते.

2. 31 डिसेंबर 1988 रोजी करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. 27 जानेवारी 1991 पासून कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली गेली. या करार अंतर्गत समावेश असलेले आण्विक केंद्रे आणि सुविधा यांच्या माहितीचे आदानप्रदान उभय देश एकमेकांत दरवर्षी एक जानेवारीला करतात. उभय देशांत करण्यात आलेले यादीचे यंदाचे सलग 34 वे आदानप्रदान ठरले आहे. पहिले आदानप्रदान 1 जानेवारी, 1992 रोजी करण्यात आले होते.

नवी दिल्ली

01 जानेवारी, 2025